PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Ek Gaon Bara Bhangadi
Year: 1968

Song: Jay Gananayak Siddhivinayak
Lyricist: Jagdish Khebudkar

जय गणनायक सिद्धिविनायक
सुख वरदायक तुज नमितो
जय गणनायक सिद्धिविनायक
सुख वरदायक तुज नमितो
गजमुख धारक तू जग पालक
मी तव बालक तुज नमितो
मी तव बालक तुज नमितो
गण गवळण झाली सुरू
हो... हो
गण गवळण झाली सुरू
पायी घुंगरू लागं थरथरू
उडाली घाई
सूर तालाला मारी मिठी
तिठीला दिठी
फुटावी ओठी शब्दाची लाही
हे... हे
जी जी रं जी रं रामा
जी जी रं जी
जी जी रं जी रं रामा
जी जी रं जी
सभाजनांची झाली गर्दी
ओ सभाजनांची झाली गर्दी
जमले बहु दर्दी
लागली वर्दी शिवाच्या कानी
शिवाच्या कानी शिवाच्या कानी

गणगोत करूनी गोळा
नटेश्वर भोळा
की लगबग आला कैलासावरूनी
कैलासावरूनी कैलासावरूनी
संगती बाळ रूपडे गजानन पुढे
बघतो चहुकडे कौतुकापोटी
कौतुकापोटी कौतुकापोटी
द्या वरदान रसिकावरा
ओ... हो
द्या वरदान रसिकावरा
तुमच्या लेकरा आशिर्वाद करा
आस ही मोठी
आस ही मोठी
आस ही मोठी
तुमी उदार आश्रय दिला
ओ...
तुमी उदार आश्रय दिला
म्हणूनी ही कला जगाला दिसली
अन् जोवरी तुमची कृपा
तोवरी वाण आम्हाला कसली
अन् जोवर तुमची कृपा
तोवरी वाण आम्हाला कसली
अन् जोवर तुमची कृपा
तोवरी वाण आम्हाला कसली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*